**महाराष्ट्र शासन**

**गृहनिर्माण विभाग**

**नविन प्रशासन भवन, ६ वा मजला, मादाम कामा मार्ग,**

**हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०००३२**

**सक्षम प्राधिकारी भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, पुणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद व आमरावती विभागा करीता सरळसेवा भरती**

जा. क्र. भानिका - २०१८/आस्था/पदभरती/९ दिनांक. ७ ऑगस्ट २०१८

# जाहिरात

महाराष्ट्र शासन गृहनिर्माण विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणा खालील सक्षम प्राधिकारी, भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, पुणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद व आमरावती विभागांच्या आस्थापनेवरील गट- ब (अराजपत्रित), गट - क व गट -ड संवर्गातील खालील पदांची सरळसेवा भरती प्रक्रीया राबविण्यात येत आहे.

| अनु | पदांचे नाव | वेतनश्रेणी | एकूण भरावयाची पदे | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुणे विभाग | नाशिक विभाग | नागपुर विभाग | औरंगाबाद विभाग | आमरावती विभाग |
| १. | निम्नश्रेणी लघुलेखक | रू. ९३००-३४८०० ग्रेड वेतन ४३०० | १ | ० | १ | १ | १ |
| २. | लिपिक - टंकलेखक | रू. ५२००-२०२०० ग्रेड वेतन १९०० | २ | २ | २ | २ | २ |
| ३. | प्रोसेस सर्व्हर | रू. ५२००-२०२०० ग्रेड वेतन २८०० | १ | १ | १ | १ | १ |
| ४. | शिपाई | रू. ४४४०-७४४० ग्रेड वेतन १३०० | १ | १ | २ | २ | २ |

उपरोक्त पदांसाठी पदभरर्ती खालील विवरणपत्रात नमुद केल्या प्रमाणे त्या त्या प्रवर्गातील पात्र उमेदवारांकडून सदर जाहिरातीव्दारे दिनांक ९ ऑगस्ट २०१८ पासून दिनांक २९ ऑगस्ट २०१८ पावेतोच्या कालावधीत www.mahapariksha.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर फक्त ऑन लाईन (Online) पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

या व्दारे असे देखिल आवाहन करण्यात येते की, जाहीरात प्रसिद्धीच्या दिवसापावेतो म्हणजेच दिनांक. ९ ऑगस्ट २०१८ रोजी, सदर जाहीरातीमध्ये नमुद पदांसाठी आवश्यक अर्हता प्राप्त उमेदवारच फक्त अर्ज करू शकतात. तसेच टपालाव्दारे/हस्त बटवडयाने अथवा कुरिअरने पाठविलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.

**भरावयाच्या पदांचा पदनिहाय, सामाजिक व समांतर आरक्षणाची पदे दर्शविणारा तक्ता**

**सक्षम प्राधिकारी, भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, पुणे विभाग पुणे करीता भरावयाची पदे**

| अ क्र | पदांचे नाव | जातीचा प्रवर्ग (सामाजीक आरक्षण) | भरावयाची एकूण पदे | समांतर आरक्षण नुसार भरावयाची पदे | | | | | | इतर (समांतर आरक्षण व्यतिरिक्त) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | महिला ३०% | माजी सैनिक १५% | अंशकालीन उमेदवार १०% | खेळाडू ०५% | प्रकल्पग्रस्त ०५% | भूकंपग्रस्त ०२% | |
| १. | निम्नश्रेणी लघुलेखक | खुले (Open to all) | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| २. | लिपिक- टंकलेखक | अनु.जाती | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | | खुला | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ३. | प्रोसेस सर्व्हर | खुले (Open to all) | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ४. | शिपाई | अनु.जाती | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |

**सक्षम प्राधिकारी, भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, नाशिक विभाग नाशिक करीता भरावयाची पदे**

| अ क्र | पदांचे नाव | जातीचा प्रवर्ग (सामाजीक आरक्षण) | भरावयाची एकूण पदे | समांतर आरक्षण नुसार भरावयाची पदे | | | | | | इतर (समांतर आरक्षण व्यतिरिक्त) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | महिला | माजी सैनिक | अंशकालीन उमेदवार | खेळाडू | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | |
| | | | | ३०% | १५% | १०% | ०५% | ०५% | ०२% | |
| १. | लिपिक - टंकलेखक | अनु.जाती | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | | खुला | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| २. | प्रोसेस सर्व्हर | खुले (Open to all) | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ३. | शिपाई | खुला | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |

**सक्षम प्राधिकारी, भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, नागपूर विभाग नागपूर करीता भरावयाची पदे**

| अ क्र | पदांचे नाव | जातीचा प्रवर्ग (सामाजीक आरक्षण) | भरावयाची एकूण पदे | समांतर आरक्षण नुसार भरावयाची पदे | | | | | | इतर (समांतर आरक्षण व्यतिरिक्त) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | महिला | माजी सैनिक | अंशकालीन उमेदवार | खेळाडू | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | |
| | | | | ३०% | १५% | १०% | ०५% | ०५% | ०२% | |
| १. | निम्नश्रेणी लघुलेखक | खुले (Open to all) | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| २. | लिपिक - टंकलेखक | अनु.जाती | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | | खुला | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ३. | प्रोसेस सर्व्हर | खुले (Open to all) | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ४. | शिपाई | अनु.जाती | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | | खुला | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |

**सक्षम प्राधिकारी भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, औरंगाबाद विभाग औरंगाबाद करीता भरावयाची पदे**

| अ क्र | पदांचे नाव | जातीचा प्रवर्ग (सामाजीक आरक्षण) | भरावयाची एकूण पदे | समांतर आरक्षण नुसार भरावयाची पदे | | | | | | इतर (समांतर आरक्षण व्यतिरिक्त) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | महिला | माजी सैनिक | अंशकालीन उमेदवार | खेळाडू | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | |
| | | | | ३०% | १५% | १०% | ०५% | ०५% | ०२% | |
| १. | निम्नश्रेणी लघुलेखक | खुले (Open to all) | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| २. | लिपिक - टंकलेखक | अनु.जाती | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | | खुला | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ३. | प्रोसेस सर्व्हर | खुले (Open to all) | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ५. | शिपाई | अनु.जाती | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | | खुला | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |

**सक्षम प्राधिकारी भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, अमरावती विभाग आमरावती करीता भरावयाची पदे**

| अ क्र | पदांचे नाव | जातीचा प्रवर्ग (सामाजीक आरक्षण) | भरावयाची एकूण पदे | समांतर आरक्षण नुसार भरावयाची पदे | | | | | | इतर (समांतर आरक्षण व्यतिरिक्त) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | महिला | माजी सैनिक | अंशकालीन उमेदवार | खेळाडू | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | |
| | | | | ३०% | १५% | १०% | ०५% | ०५% | ०२% | |
| १. | निम्नश्रेणी लघुलेखक | खुले (Open to all) | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| २. | लिपिक - टंकलेखक | अनु.जाती | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | | खुला | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ३. | प्रोसेस सर्व्हर | खुले (Open to all) | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ४. | शिपाई | अनु.जाती | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | | खुला | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |

**टिप**

१. जाहिराती मध्ये नमुद पदांच्या संख्येमध्ये विभागातील पदांचा आढावा इत्यादी आणि अन्य कारणांमुळे पदसंख्या (पदसंख्या कमी/जास्त होणे) व जात निहाय आरक्षण किंवा समांतर आरक्षणांमध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

२. जाहिराती मध्ये नमूद पदांच्या संख्ये मध्ये कमी/जास्त बदल होण्याचा संभव आहे. म्हणून याबद्दल उमेदवारांची कोणतीही तक्रार ग्राहय धरण्यात येणार नाही. याबाबतचे अधिकार शासनाने राखुन ठेवले आहेत.

३. शासनाने भरतीबाबत/नियुक्तीबाबत वेळोवेळी निर्गमित केलेले अधिसूचना व शासन निर्णय, परिपत्रके, आदेश, इत्यादी लागू राहतील. उपरोक्त विवरणपत्रां मध्ये नमुद केलेली एकाकी पदे असल्याने समांतर आरक्षण व अपंगांना आरक्षण उपलब्ध नाहीत.

   १. जाहिराती मध्ये नमुद पदे नविन पदनिर्मितीने, सेवानिवृतीने, इत्यादीने रिक्त झालेली आहे.

   २. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. **प्रनिम-१२१६/प्र.क्र.६५/१६/१३-अ दि. १३ जून २०१८** मधील तरतुदी नुसार, सदरची पदे भरणेसाठी अंतिम निवडसूची व प्रतिक्षासूची ही सदर याद्या प्रसिद्ध झाल्याच्या दिनांका पासून एक वर्ष मुदतीसाठी किंवा निवडसूचीतयार करतांना ज्या दिनांकापर्यंताची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत त्या दिनांका पर्यंत जे नंतर घडेल त्या दिनांका पर्यंत विधी ग्राहय ठरेल. तद्नंतर ही निवड यादी व प्रतिक्षायादी व्यपगत होईल.

   ३. सदर जाहिराती मध्ये दर्शविलेल्या रिक्त पदांच्या संख्येत कमी/जास्त बदल होण्याची शक्यता आहे. काही अपरिहार्य कारणाने परिक्षा स्थगित झाल्यास त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परीक्षेचा प्रकार पदांची संख्या, समांतर आरक्षण व सामाजिक आरक्षण याबाबत बदल करणे, परिक्षा स्थगित करणे व रद्द करणे, परीक्षेच्या कार्यक्रमामध्ये अंशत: बदल करणे तसेच सेवा भरती प्रक्रियेत बदल करणे याबाबतचे अधिकार शासनाने राखुन ठेवले आहेत. भरती प्रक्रिये संदर्भात उदभवणारे कोणतेही वाद, तक्रारी इत्यादी बाबत शासनाचे अधिकार अंतिम राहतील.

**<u>शैक्षणिक अर्हता</u>**

जाहिराती मध्ये नमुद पदांसाठी अर्ज करणेकामी जाहिरात प्रसिद्धीच्या दिवशी म्हणजेच दि. ९ ऑगस्ट २०१८ रोजी उमेदवारांने पुढील प्रमाणे शैक्षणिक अर्हता पुर्णत: धारण करणे आवश्यक आहे.

| अ.क्र | पदांचे नाव | आवश्यक शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १. | निम्नश्रेणी लघुलेखक | **पात्रतेचे निकष :-**<br>अ) उमेदवार कोणत्याही मान्यता प्राप्त विद्यापिठाचा पदवीधारक असावा. कायदयाच्या पदवीधारकास प्राधान्य दिले जाईल.<br>ब) शासकीय वाणीज्य प्रमाणपत्र परिक्षा, किंवा शासकीय मंडळ अथवा, आय.टी.आय (ITI) व्दारे घेतली जाणारी १०० श.प्र.मि. वेगाची इंग्रजी किंवा मराठी लघुलेखन आणि कमीतकमी ४० श.प्र.मि. इंग्रजी टंकलेखन आणि ३० श.प्र.मि. वेगाची मराठी टंकलेखन उत्तीर्ण असावा<br>क) संगणकाचे ज्ञान असल्याबाबतचे खालील संस्थाकडील प्रमाणपत्रधारक असावा<br>१. डी.ओ.ई.ए.सी.सी/एन्.आय्.ई.एल्.आय.टी. (D.O.E.A.C.C/ N.I.E.L.I.T)<br>२. विद्यापीठ<br>३. सी-डॅक (C-DAC)<br>४. एम्.एस्.-सी.आय्.टी (MS-CIT)<br>ड) दिनांक २८.०३.२००६ नंतर जन्मास आलेल्या मुलांमुळे उमेदवाराच्या हयात मुलांची संख्या एकूण ०२ पेक्षा जास्त असु नये. |
| २. | लिपिक - टंकलेखक | पात्रतेचे निकष :-<br>अ) उमेदवार कोणत्याही मान्यता प्राप्त विद्यापिठाचा पदवीधारक असावा. कायदयाच्या पदवीधारकास प्राधान्य दिले जाईल.<br>ब) शासकीय वाणीज्य प्रमाणपत्र परिक्षा, किंवा शासकीय मंडळ अथवा, आय.टी.आय (ITI) व्दारे घेतली जाणारी ४० श.प्र.मि. इंग्रजी टंकलेखन आणि ३० श.प्र.मि. मराठी टंकलेखन वेगाची परिक्षा उत्तीर्ण असावा<br>क) संगणकाचे ज्ञान असल्याबाबतचे खालील संस्थाकडील प्रमाणपत्रधारक असावा<br>१. डी.ओ.ई.ए.सी.सी/एन्.आय्.ई.एल्.आय.टी. (D.O.E.A.C.C/ N.I.E.L.I.T)<br>२. विद्यापीठ<br>३. सी-डॅक (C-DAC)<br>४. एम्.एस्.-सी.आय्.टी (MS-CIT)<br>ड) दिनांक २८.०३.२००६ नंतर जन्मास आलेल्या मुलांमुळे उमेदवाराच्या हयात मुलांची संख्या एकूण ०२ पेक्षा जास्त असु नये. |
| ३. | प्रोसेस सर्व्हर | **पात्रतेचे निकष :-**<br>अ) उमेदवार कोणत्याही मान्यता प्राप्त विद्यापिठाचा पदवीधारक असावा<br>ब. दिनांक २८.०३.२००६ नंतर जन्मास आलेल्या मुलांमुळे उमेदवाराच्या हयात मुलांची संख्या एकूण ०२ पेक्षा जास्त असु नये. |
| ४. | शिपाई | **पात्रतेचे निकष :-**<br>अ. माध्यमिक शालान्त परिक्षा एस.एस.सी (S.S.C) बोर्ड परिक्षा उत्तीर्ण असावा<br>ब. दिनांक २८.०३.२००६ नंतर जन्मास आलेल्या मुलांमुळे उमेदवाराच्या हयात मुलांची संख्या एकूण ०२ पेक्षा जास्त असु नये. |

उमेदवारांची खालील एका गटात (Group) नमुद करण्यात आलेल्या पदांसाठी संगणक आधारीत (Computer Based online examination) परिक्षा ही एकाच वेळी सर्वत्र घेण्यात येणार आहे. उमेदवारास एका विभागाची निवड करावी लागेल म्हाणजेच उमेदवार एका गटात (Group) एक या क्रमाने जास्तीस जास्त चार पदांसाठी अर्ज करू शकतो

| परिक्षे करीता गटांचा तपशिल | पदांचा तपशिल |
|---|---|
| गट क्र. १. ( Group No.1 ) निम्नश्रेणी लघुलेखक | निम्नश्रेणी लघुलेखक - पुणे विभाग |
| | निम्नश्रेणी लघुलेखक - नागपूर विभाग |
| | निम्नश्रेणी लघुलेखक - औरंगाबाद विभाग |
| | निम्नश्रेणी लघुलेखक - आमरावती विभाग |
| गट क्र. २. ( Group No. 2 ) लिपिक | लिपिक - टंकलेखक - पुणे विभाग |
| | लिपिक - टंकलेखक - नाशिक विभाग |
| | लिपिक - टंकलेखक - नागपूर विभाग |
| | लिपिक - टंकलेखक - औरंगाबाद विभाग |
| | लिपिक - टंकलेखक - आमरावती विभाग |
| गट क्र. ३. ( Group No. 3 ) प्रोसेस सर्व्हर | प्रोसेस सर्व्हर - पुणे विभाग |
| | प्रोसेस सर्व्हर - नाशिक विभाग |
| | प्रोसेस सर्व्हर - नागपूर विभाग |
| | प्रोसेस सर्व्हर - औरंगाबाद विभाग |
| | प्रोसेस सर्व्हर - आमरावती विभाग |
| गट क्र. ४. ( Group No. 4 ) शिपाई | शिपाई - पुणे विभाग |
| | शिपाई - नाशिक विभाग |
| | शिपाई - नागपूर विभाग |
| | शिपाई - औरंगाबाद विभाग |
| | शिपाई - आमरावती विभाग |

**वयोमर्यादा**

**सर्व पदांकरिता वयोमर्यादा**

शासन निर्णय, सामन्य प्रशासन विभाग, क्रमांक एस.आर.व्ही-२०१५/प्र.क्र.४०४/कार्या.१२ दि. २५ एप्रिल २०१६ अन्वये दिनांक २९ ऑगस्ट २०१८ रोजी सर्व साधारण प्रवर्गातील उमदेवारां करीता १८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षा पेक्षा जास्त वयाचा नसावा आणि मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४३ वर्षा पेक्षा जास्त वयाचा नसावा.

माजी सैनिकांसाठी विहित वयोमर्यादेतील सवलत, सामन्य प्रशासन विभाग,शासन शुध्दीपत्रक क्र. मासैक-१०१०/ प्र.क्र. २७९/१०१६-अ दिनांक २०/०८/२०१६ मधील तरतूदीप्रमाणे देण्यात येईल.

पात्रतेच्या अटी व शर्ती.

**निम्नश्रेणी लघुलेखक, लिपिक व प्रोसेस सर्व्हर गट-क व शिपाई गट-ड पदांच्या निवडीसाठी कार्यपद्धती, आवश्यक कागदपत्रे तसेच इतर महत्वाच्या अटी व शर्ती.**

१) उमेदवार हा महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असावा त्याला मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. व त्यांचेकडे महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) असणे आवश्यक आहे. उमेदवारांनी यांची नोंद घ्यावी की, ते सक्षम प्राधिकारी, भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, पुणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद व आमरावती विभागातील पदांसाठी अर्ज करू शकतात.

२) उमेदवाराने यापुढे याची नोंद घ्यावी की, एकच उमेदवार दोनदा अर्ज करू शकणार नाही, आणि प्रत्येक उमेदवाराचा एकच अर्ज असेल. जर एकाच उमेदवाराने अनेक अर्ज भरले तर, फक्त पहिला अर्ज विचारात घेतला जाईल. जर आवश्यक अर्हतेप्रमाणे उमेदवार अर्हताप्राप्त नसेल, तर त्या पदाचा पर्याय त्याच्यासाठी उपलब्ध नसेल.

३) अपुर्ण अर्ज किंवा असा अर्ज जो उमेदवाराने सादर केलेल्या तपशीलांमुळे त्यास पदासाठी अपात्र ठरवेल तो संगणक स्वीकारणार नाही.

४) उमेदवाराने असे नमूद करावे की, त्यास राखीव प्रवर्गाचा म्हणून विचारात घेण्याची इच्छा आहे की त्यास खुल्या प्रवर्गाचा उमेदवार म्हणून विचारात घेण्याची इच्छा आहे. जर उमेदवाराने त्यास राखीव प्रवर्गाचा म्हणून विचारात घेण्याचा पर्याय स्वीकारला आणि जर त्याने त्या प्रवर्गाचा म्हणून त्याचा विचार करण्यासाठी पात्र ठरविणारी प्रमाणपत्रे सादर केली नाहीत

तर, त्याने चुकीची माहिती दिली म्हणून त्यास अपात्र ठरविण्यात येईल, आणि त्याचा खुल्या प्रवर्गासाठी विचार करण्यात येणार नाही.

५) उमेदवाराने अर्ज 'ऑन-लाईन ' सादर करण्याच्या टप्प्यावर कोणतीही मुळ कागदपत्रे प्रमाणपत्रे अथवा त्यांच्या साक्षांकित प्रती पाठवू नयेत.

६) उमेदवारांनी सक्षम प्राधिकारी, भाडे नियंत्रण कायदा न्यायलय, पुणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद व अमरावती विभागातील न्यायालयात उपरोक्त पदांसाठी केलेल्या अर्जा संदर्भात कोणतीही चौकशी करू नये अशी चौकशी या न्यायालयां मध्ये विचारात घेतली जाणार नाही. यांची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

७) उमेदवारांनी याची नोंद घ्यावी की, उमेदवारांनी दिलेली माहिती खरी आहे असे समजून त्यांची पात्रता निर्धारित करण्यात येईल. जर एखाद्या उमेदवाराने दिलेली माहिती ही खोटी सदोष अथवा चुकीची आहे असे आढळून आल्यास, अशा उमेदवारास केवळ अनर्ह ठरविण्यात येईल असे नव्हे तर त्यावर खटलासुद्धा भरण्यात येईल. अशा उमेदवारास कोणत्याही परीक्षेस बसण्यास मनाई करण्यात येईल. तसेच, सक्षम प्राधिकारी, भाडे नियंत्रण कायदा न्यायलय, पुणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद व आमरावती विभागातील न्यायालयातील कोणत्याही पदासाठी अर्ज करण्यास मनाई करण्यात येईल.

८) निम्नश्रेणी लघुलेखक, लिपिक व प्रोसेस सर्व्हर गट-क व शिपाई गट-ड या पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांसाठी शासन निर्णय क्र. रिपभा/प्र.क्र.६६/२०११/ई-१० दि. २७ जुन २०११ नुसार ज्या परिक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उपलब्ध नसल्यास त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्म दाखला (Birth Certificate) सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणांत अधिवास प्रमाणापत्राची अट लागू राहणार नाही. सदर परिक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या परिक्षार्थीने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याचा दाखल्यामध्ये त्या परिक्षार्थीचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे. अशा प्रकरणांतदेखील अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही.. उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या परिक्षार्थीसाठी लागू राहतील. इतर परिक्षार्थी/उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील.

९) उमेदवारांने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे परीक्षेला बोलावण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

१०) आरक्षित मागास प्रवर्गाचा दावा करणाऱ्या उमेदवारांना ज्या संदर्भातील सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र (Cast Certificate) व उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र (Validity Certificate) निवडीअंती सादर करणे आवश्यक आहे.

११) जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र.बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब दि. १२.१२.२०११ मधील तरतुदीनुसार, याचिका क्र. २१३६/२०११ व अन्य याचिकांवर मा. मुंबई उच्च न्यायलयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि. २५.०८.२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एस.एल.पी. मधील आदेशाच्या अधीन राहून तात्पुरते नियुक्ती आदेश निर्गामित केल्याच्या दिनांकापासून ०६ महिन्याचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा त्यांची नियुक्ती पुर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल.

१२) महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागासवर्ग यांचेसाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दि. २९ जानेवारी २००४ पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमिलेअर) तत्व वि.जा.अ, भ.ज.ब, भ.ज.-क, भ.ज.-ड, वि.मा.प्र. व इ.मा.व यांना लागू आहे. सदर प्रवर्गातील उमेदवारांकडे दि ३१ मार्च २०१७ पर्यंत वैध असलेल नॉन क्रिमिलेअरचे सक्षम अधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. नॉन क्रिमिलेअरचे तत्व अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती व्यतिरिक्त इतर सर्व मागास प्रवर्गाना लागू राहील.

१३) उमेदवारांना लेखी परिक्षासाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१४) संगणक आधारीत (Computer Based online examination) परिक्षा मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद व अमरावती या प्रत्येक महसूल विभागातील निश्चित केलेल्या परिक्षा केंद्रांवर घेण्यात येईल.

१५) एखाद्या अर्जदाराने त्यांची निवड करणेसाठी शासकीय अधिकाऱ्यावर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष राजकीय अथवा अन्य प्रकाराने दबाव आणल्यास अथवा गैर प्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून अपात्र ठरविणेत येईल.

१६) नियुक्त होणाऱ्या उमेदवारास शासन निर्णय दि. २१.१०.२००५ नुसार लागु करण्यात आलेली नवीन परिभाषित अंशदायी नियुक्तीवेतन योजना (New Defined Contributory Pension Scheme) लागु राहील. त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृतीवेतनाचे अंशराशीकरण), नियम १९८४ आणि सर्वसाधारण भविष्य निर्वाहनिधी योजना लागू राहणार नाही.

१७) अंतीम निवडसूची व प्रतिक्षासूची मध्ये समावेश झालेल्या उमेदवारांनी पात्रतेबाबत सादर करावयाची कागदपत्रे.

i) सामान्य प्रशासन विभागाकडील शासन अधिसुचना क्र. एस.आर.व्ही २०००/प्र.क्र.१७/२०००/१२ दि. २८.०३.२००५ व शासन परिपत्रक क्र. एस.आर.व्ही २०००/प्र.क्र/१७/२०००/१२ दि. ०१.०७.२००५ तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ अन्वये दि. २८.०३.२००५ रोजी हयात असलेली व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांच्या संख्ये बाबत लहान कुटूंब असल्याचे विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच अविवाहीत असणाऱ्या उमेदवारानेही विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

ii) शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव, अधिवास दाखला (Domicile Certificate) तसेच जातीचा दाखला, उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र, अ.ज./अ.जा.उमेदवार/अर्जदार वगळून इतरांसाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसलेबाबत (Non Creamylayer) इत्यादी प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक आहे. साक्षांकित प्रती केंद्र/राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी, पोस्ट मास्टर, मुख्याध्यापक व याबाबत प्राधिकृत व सक्षम अधिकाऱ्यांनीच केलेले असावे तसे नसल्यास किंवा चुकीची माहिती असल्यास आपली निवड रद्द समजण्यात येईल.

१८) अंतिम निवड यादीमधील पात्र उमेदवारांनी सादर केलेल्या विविध प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती मुळ प्रमाणपत्राच्या आधारे कागदपत्र तपासणीच्या वेळी तपासण्यात येतील. सदर प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती मुळ प्रमाणपत्राच्या आधारे कागदपत्र तपासणीच्या वेळी उपलब्ध करून देणे उमेदवारांवर बंधनकारक राहील. त्यामधील प्रमाणपत्रे खोटी किंवा चुकीची आढळल्यास संबंधित उमेदवार आपात्र ठरविण्यात येईल.

१९) निम्नश्रेणी लघुलेखक पदा करीता अर्ज करणाऱ्या पात्र उमेदवारांची प्रथम संगणक आधारीत (Computer Based online examination) परिक्षा घेण्यात येईल. सदर परिक्षेत गुणवत्ता पात्र उमेदवारांची नंतर श्रृतलेखन / लघुलेखन व टंकलेखन वेग चाचणी परिक्षा घेण्यात येईल. या दोन्ही परिक्षेत मिळालेल्या एकत्रित गुणांच्या आधारे व त्या उमेदवारांची कागदपत्रे वैध ठरल्यास अंतिम निवडसुची तयार केली जाईल. अंतरिम निवड यादी मधुन पदांच्या आरक्षणानुसार व पदांच्या उपलब्धतेनुसार उमेदवारांची अंतिम निवडसूची तयार केली जाईल.

२०) विहित शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा धारण करणाऱ्या इच्छुक शासकीय/निशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालयीन प्रमुखांच्या परवानगीने भरावेत व अशा परवानगीची प्रत मुळ कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

२१) नियुक्ती झाल्यानंतर निम्नश्रेणी लघुलेखक,लिपिक व प्रोसेस सर्व्हर गट-क व शिपाई गट-ड यांना त्यांनी ज्या सक्षम प्राधिकारी भाडे नियंत्रण कायदा न्यायालय, **ज्या** विभागाकडे अर्ज केले असतील त्या विभागात त्यांना नियुक्ती देण्यात येईल. संबंधीत उमेदवार यांनी त्यांचे नियुक्तीच्या पदावर नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासुन **३०** दिवसांचे आंत रूजु होणे आवश्यक राहील.

२२) शासकीय सेवेत रूजू होण्यापूर्वी संबधीत उमेदवाराने वैदयकीय दृष्टया सक्षम असल्याचे जिल्हा शासकीय रूग्णालयाचे वैदयकीय प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

२३) शासकीय सेवेत संबधित उमेदवाराची नियुक्ती त्याच्या पूर्वचारीत्र व वर्तणूक (पोलीस चौकशी) यांच्या समाधानकारक तपासणी अहवालावर अवलंबून राहील व तसा तपासणी अहवाल आक्षेपार्ह असल्यास संबधीत उमेदवाराची नियुक्ती रदद् करण्यात येईल. अशा प्रकरणी सामान्य प्रशासन विभाग, शासन परीपत्रक क्रमांक **चाआप-१०१२/प्र.क्र.६३/१६-अ दिनांक २६ ऑगस्ट २०१४** नुसार गठीत केलेल्या समितीच्या निर्णयानुसार व परिपत्रकातील मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करून योग्य तो निर्णय घेतला जाईल. तसेच या पूर्वीच संबधीत उमेदवारास नियुक्ती दिली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता सेवूतून काढून टाकण्यात येईल.

**परिक्षेचे स्वरूप**

निम्नश्रेणी लघुलेखक, प्रोसेस सर्व्हर, लिपिक पदासाठी १०० गुणांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाची संगणक आधारीत (Computer Based online examination) परिक्षा घेण्यात येणारी परिक्षा ही **१००** प्रश्नाची व **१००** गुणांची घेतली जाईल. प्रश्न पत्रीकेतील प्रत्येक प्रश्नास एक गुण ठेवण्यात आला आहे.

शासन सामान्य प्रशासन विभागाकडील निर्णय क्र. प्रानिम.२००७/ प्र.क्र.४६/०७/१३-अ दिनांक १९.१०.२००७ मधील तरतुदीनुसार निम्नश्रेणी लघुलेखक, प्रोसेस सर्व्हर व लिपिक पदासाठी पदवी ही कमीत कमी अर्हता असल्याने सदर पदासाठी परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठाच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. परंतु मराठी या विषयाच्या प्रश्न पत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालान्त परीक्षेच्या (इयता १२ वी) च्या दर्जाच्या समान राहील व संगणक आधारीत (Computer Based online examination) परिक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौद्धीक चाचणी या विषयावरील प्रश्नाकरीता प्रत्येकी २५ - गुण ठेवून एकूण १०० गुणांची सर्व पदांकरीता संगणक आधारीत (Computer Based online examination) घेण्यात येणारी परिक्षा ही **१००** प्रश्नाची व **१००** गुणांची घेण्यात येईल त्या साठी एक तास कालावधी असेल. इंग्रजी विषयासंबधीचे प्रश्न वगळता इतर प्रश्न मराठी माध्यामातून असतील.

शिपाई पदा करीता संगणक आधारीत (Computer Based online examination) घेण्यात येणारी परिक्षा ही **७५** प्रश्नाची **७५** गुणांची घेण्यात येईल त्या साठी एकतास कालावधी असेल मराठी, सामन्य ज्ञान व बौद्धीक चाचणी या विषयावरील प्रश्नाकरीता प्रत्येकी २५ - गुण ठेवु एकूण **७५** गुणांची संगणक आधारीत (Computer Based online examination) परिक्षा घेण्यात येईल. मराठी सामन्य ज्ञान व बौद्धीक चाचणी परिक्षेचा दर्जा एस.एस.सी. इयता १० वी अभ्यासक्रमावर आधारीत राहील व प्रश्न मराठी माध्यामातून असतील. प्राप्त गुणांच्या आधारे गुणवत्ते नुसार पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची अंतीम निवड करण्यात येईल.

उपरोक्त पदां पैकी केवळ निम्नश्रेणी लघुलेखक पदाच्या संगणक आधारीत (Computer Based online examination) परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या गुणवत्ता प्राप्त उमेदवारांच्या गुणांचे मुल्यांकन करून पात्र उमेदवारांनाच फक्त मराठी व इंग्रजी भाषेची २० गुणांची इंग्रजी व स्थानिक / मराठी भाषेतील लघुलेखनाची वेगचाचणी परिक्षा घेण्या करीता पाचारण केले जाईल. मराठी / इंग्रजी लघुलेखन व टंकलेखन वेग चाचणी परिक्षेचा कालावधी शासकीय नियमा नुसार संबधीत परीक्षक निश्चित करतील. मात्र मराठी / इंग्रजी टंकलेखनाची संगणकावर चाचणी परिक्षा द्यावी लागेल. संगणक आधारीत (Computer Based online examination) परीक्षेत उमेदवारांना प्राप्त झालेले गुण अधिक लघुलेखन व टंकलेखन परीक्षेत प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवडसूची व प्रतिक्षा सुची तयार करण्यासाठी उमेदवारांना त्यांचे शैक्षणिक व इतर संबंधित मुळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करून दयावे लागतील. त्याआधारे पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची अंतीम निवड करण्यात येईल.

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रानिम १२१५/(प्र.क्र.१०९/१५)१३-अ,दिनांक. ५.ऑक्टोबर.२०१५ मधील तरतुदीनुसार या पदांकरीता मौखिक परिक्षा (मुलाखती) घेण्यात येणार नाहीत.

उमेदवारांची निवडसूची तयार करणेसाठी शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र. एसआरव्ही-१०९७/प्र.क्र./३१/९८/१६अ दि. १६.०३.१९९९ आणि शासन सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र. एसआरव्ही-१०१२/प्र.क्र./१६/१२/१६अ दि. १३.०८.२०१४ अन्वये कार्यवाही करण्यात येईल.

सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.प्रानिम-२००७/प्र.क्र४६/०७/१३-अ दि. २७.०६.२००८ मधील तरतुदीनुसार गुणवत्ता यादीमध्ये अंतर्भाव करण्यासाठी उमेदवारांनी एकूण गुणांच्या किमान ४५% गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

परीक्षेचा निकाल (निवडसुची) तयार करतांना परीक्षेत ज्या उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा प्राधान्यक्रम हा महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रानिम-१२१५/प्र.क्र.५५/१५/१३-अ दि. ०५.१०.२०१५ मध्ये नमुद निकषांच्या आधारे क्रमवार लावला जाईल.

संगणक आधारीत (Computer Based online examination) परिक्षा दिलेल्या उमेदावारांना त्यांना मिळालेले गुण www.mahaparisha.gov.in या संकेतस्थळावर पाहता येतील. या गुणवत्ता यादीतून सामाजिक/समांतर आरक्षण निहाय अंतरिम गुणवत्ता यादी उक्त संकेतस्थळावर जाहीर केली जाईल.

# परिक्षा शुल्क

सदर भरती प्रक्रियेत खालील प्रमाणे शुल्क आकारले जाणार असुन सदर परिक्षा शुल्क हे ना परतावा राहील.

| अ.क्र. | पदांचे नाव | **महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय, मुंबई -४०००३२ शासन निर्णय. प्रानिमं : १२१६/ प्र.क्र. ६५/ १३अ दि.१३ जून २०१८** | |
|---|---|---|---|
| | | खुला प्रवर्ग | राखीव प्रवर्ग (मागास प्रवर्ग) |
| १. | निम्नश्रेणी लघुलेखक | रक्कम रूपये **३००/-** | रक्कम रूपये **१५०**/- |
| २. | लिपिक | रक्कम रूपये **३००/-** | रक्कम रूपये **१५०**/- |
| ३. | प्रोसेस सर्व्हर | रक्कम रूपये **३००/-** | रक्कम रूपये **१५०**/- |
| ४. | शिपाई | रक्कम रूपये **३००/-** | रक्कम रूपये **१५०**/- |

प्रत्येक पदासाठी स्वंतत्रपणे फीची आकारणी केली जाईल उदा. खुल्या प्रवर्गातील उमेदवाराने जर दोन पदांकरीता अर्ज केला तर त्यांना रूपये **६००**/- तर राखीव प्रवर्ग (मागास प्रवर्ग) उमेदवाराने जर दोन पदांकरीता अर्ज केला तर त्यांना रूपये **३००**/- फी ऑन लाईन पध्दतीने भरावीच लागेल

**ऑन लाईन (On line) अर्ज करावयाची कार्यपद्धती व इतर सुचना**

१. निम्नश्रेणी लघुलेखक, लिपिक, प्रोसेस सर्व्हर व शिपाई पदा करीता अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी संपुर्ण जाहिरात काळजीपुर्वक वाचावी. सगळ्या सूचना वाचूनच व्यावस्थित अर्ज भरावा अर्जामध्ये खालील टप्पे आहेत

१. **नोंदणी**
२. **अर्जावरील माहितीचे पूर्वावलोकन**
३. **ऑनलाईन शुल्क भरणा**
४. **अर्जाची प्रिंटआऊट**

१. उमेदवाराचे नाव, वडीलांचे नाव, पतीचे नाव, आडनाव, वडिलांचे नाव, आईचे नाव, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक, छायाचित्र, स्वाक्षरी ही मुलभूत माहिती आहे जी उमेदवाराला सविस्तर द्यावी लागेल.
२. छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड करण्यासंबंधी माहिती - कृपया उंची आणि रूंदी प्रत्येकी २०० Pixel असलेले छायाचित्र स्कॅन करून अपलोड करा आणि अर्जामध्ये अपलोड करा. प्रतिमेची उंची ६० पिक्सल आणि रूंदी १४० पिक्सल असावी. प्रतिमेचे आकारमाने ३ KB ते ५० KB च्या दरम्यान असावे (टिप उमेदवाराचे छायाचित्र (फोटोग्राफ) मागिल १ महिना कालावधीच्या आतील असावे)
३. पत्ता टाकण्यासाठी उमेदवाराने आपल्या पत्त्याचा प्रकार निश्चित करावा. उदा. कामस्वरूपी पत्ता: तात्पुरता पत्ता किंवा दोन्ही आणि त्यानुसार आपले गाव, पोस्ट ऑफिस, राज्य, जिल्हा, पिन कोड इ. सहित माहिती भरावी.
४. त्यानंतर उमेदवाराने अतिरिक्त माहितीच्या पर्यायावर क्लिक करावे आणि आपल्या जात प्रवर्गाबद्दल माहिती भरावी. उमेदवाराकडे जात प्रमाणपत्र असल्यास त्याबद्दल विचारणा केली जाईल असल्यास ड्रॉपडाऊन मधुन त्याने / तिने आपला जात प्रवर्ग निवडावा
५. ज्यांच्याकडे आधार क्रमांक आहे त्यांनी त्यासंबंधी माहिती भरावी, तसेच उमेदवाराने आधार क्रमांक/आधार नोंदणी क्रमांक याबद्दलची माहिती द्यावी.
६. तसेच मराठी भाषेतील प्राविण्य, MS-CIT प्रमाणपत्र, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे पाल्या यासंबंधीची माहिती द्यावी लागेल.
७. शैक्षणिक माहितीच्या जागी उमेदवाराने आपली सविस्तर शैक्षणिक माहिती भरावी. शैक्षणिक पात्रतेमध्ये एस.एस.सी. ची माहिती देणे अनिवार्य आहे. आपण शिपाई या पदासाठी अर्ज करत असाल तर एस.एस.सी व उर्वरित पदांसाठी अर्ज करण्यासाठी पदवीची माहिती देणे आवश्यक आहे.

८. एकदा शैक्षणिक तपशिल प्रविष्ट केले की अर्जदार पुढे या बटणावर क्लिक करावे लागेल, त्या बटणावर क्लिक केल्यानंतर अर्जदाराकडून पुष्टीची विनंती केली जाईल की त्यांनी ते बटण क्लिक केल्यास मागील तपशील संपादित करण्याची परवानगी दिली जाणार नाही.
९. येथे पदाचे विभाजन ४ वेगवेगळ्या ग्रुपमध्ये करण्यात आले आहे. एका ग्रुपमध्ये नमूद करण्यात आलेल्या पदांसाठी परीक्षा ही एकाच वेळी सर्वत्र घेण्यात येणार आहे. उमेदवारास पदासाठी एका विभागाची (Division) निवड करावी लागेल म्हणजेच उमेदवार हा एका ग्रुप मध्ये एक याप्रमाणे जास्तीत जास्त चार पदांसाठी अर्ज करू शकतो
१०. त्यानंतर उमेदवारास सर्व पदांसाठी आवश्यक असलेली लघुलेखन व टंकलेखन आणि इतर पात्रता याबद्दलची माहिती देऊन ती सेव्ह करणे आवश्यक आहे.
११. उमेदवाराने नोंदणी अर्जामध्ये दिल्याप्रमाणे परिक्षा केंद्राकरीता तीन प्राधान्यक्रम निवडू शकतो.
१२. उमेदवाराने सगळया नियम व अटी वाचून मान्यता दर्शविण्यासाठी दिलेल्या जागी क्लिक करावे. त्यानंतर ऑनलाईन पद्धतीने आवश्यक तो परीक्षा शुल्क भरणा करावा. मान्यता दर्शविल्यानंतरच अर्ज दाखल करण्यासाठीचा सबमिट हा पर्याय उपलब्ध होईल. उमेदवाराला त्याचा अर्ज डाऊनलोड किंवा प्रिंट करण्याचा पर्याय असेल.
१३. ऑनलाईन अर्ज स्विकारण्याच्या अंतिम तारखेस मध्यरात्री १२.०० वाजल्यानंतर संकेतस्थळावरील लिंक बंद केली जाईल.
१४. पदासाठी आवश्यक असणारी किमान अर्हता आणि पात्रता धारण करणाऱ्या व संगणक आधारीत (Computer Based online examination) परीक्षेस पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना या पदासाठी घेण्यात येणारी परिक्षेची रूपरेषा, वेळापत्रक, प्रवेशपत्र, परिक्षा केंद्र, बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती परीक्षेच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध राहील.
१५. परिक्षा केंद्रावर प्रवेशपत्र आणि ओळखपत्रासह परिक्षा सुरू होण्यापुर्वी एक तास अगोदर उपस्थित राहणे आवश्यक आहे. उशिरा येणाऱ्या व प्रवेशपत्र न आणणाऱ्या उमेदवारांना परिक्षेकरीता प्रवेश दिला जाणार नाही तसेच उमेदवारांनी स्वत:चे फोटो असलेले ओळखपत्र (उदा. वाहन परवाना, पॅनकार्ड, निवडणूक ओळखपत्र, आधारकार्ड इत्यादी व त्याची स्वंयसाक्षांकित छायाप्रत (झेरॉक्स) सोबत आणणे बंधनकारक राहील. फोटो असलेले ओळखपत्र व त्याची स्वंयसाक्षांकीत छायाप्रत (झेरॉक्स सोबत न आणल्यास उमेदवारास कोणत्याही परिस्थतीत परिक्षेला बसु दिले जाणार नाही.)
१६. अर्जामध्ये नमुद केलेली माहिती चुकीची अथवा खोटी आढळून आल्यास संबंधित उमेदवार दंडात्मक कारवाईस पात्र राहील. तसेच चुकीच्या माहितीच्या आधारे नियुक्ती झाल्यास संबंधित उमेदवार तात्काळ सेवेतुन काढून टाकणेस पात्र राहील व भा.द.वि. संहिताचे कलम १९९, ४२० व २००(२) प्रमाणे कारवाईस पात्र राहील.
१७. जर कोणत्याही उमेदवाराने एकापेक्षा अधिक लॉगिन आयडीसह नोंदणी केली असेल तर उमेदवारांची पहिली यशस्वी नोंदणी फक्त पुढील प्रक्रिया जसे हॉल तिकीट, परिक्षेत उपस्थिती, गुणवत्ता यादी आणि अन्य संबंधित प्रक्रियांसाठी विचारात घेण्यात येईल. कोणत्याही डुप्लीकेट नोंदणीस अवैध नोंदणी मानले जाईल आणि कोणत्याही प्रकारचे पैसे परतफेड केले जाणार नाहीत. उमेदवाराव्दारे प्रथम यशस्वी नोंदणीमध्ये काही चुकीची माहीती देण्यात आली असेल तर कृपया या विषयाबद्दलची प्रक्रियां जाणूण घेण्यासाठी enquiry@mahapariksha.gov.in वर लिहा किंवा टोल फ्री नं. 180030007766 वर कॉल करा.
१८. नोंद : नोंदणी मधील तपशील जसे की, वापरकर्ता नाव, ई-मेल आयडी, प्रवर्ग आरक्षण (लागू समांतर किंवा प्रवर्ग आरक्षण) पसंतीचे, स्थान जन्मतारिख उमेदवाराचे छायाचित्र (फोटोग्राफ) आणि स्वाक्षरी इत्यादी फॉर्म सादर केल्यानंतर बदलण्याची परवानगी दिली जाणार नाही.

**अर्जातील माहितीचे पूर्वाक्लोकन**

अ. युजरनेम आणि पासवर्ड वापरून लॉगईन केल्यावर उमेदवार आपला संक्षिप्त अर्ज पाहू शकतो
आ. अर्ज प्रिंट करण्यासाठी "प्रिंट प्रिव्ह्यु" या पर्यायावर क्लिक करा.

**ऑनलाईन भरणा**

उमेदवार क्रेडिट कार्ड/डेबिट कार्ड/एटीएम पिन/इंटरनेट बँकिंग/वॅलेट/कॅश कार्ड/आय. एम.पी.एस व्दारे शुल्क भरणा करू शकतात.

अ. उमेदवार आपापल्या सोयीनुसार भरणा करू शकतात.

आ. भरणा करण्याकरीता फक्त ऑनलाईन पर्याय उपलब्ध आहेत.

इ. उमेदवाराला जर वीज पुरवठा किंवा इंटरनेट सेवा खंडित झाल्यामुळे शुल्क भरणा करता आला नाही तर त्याने पुन्हा लॉगईन करून भरणा प्रक्रिया पुर्ण करावी.

ई. शुल्क भरणा झाल्यावर उमेदवाराला "भरणा यशस्वी" म्हणून संदेश मिळेल आणि झालेल्या व्यवहाराची सविस्तर माहिती अर्जामध्ये आपोआप येईल.

**अर्जाची प्रिंट**

अ. उमेदवाराने अर्जाची एक प्रत आपल्याकडे ठेवावी.

आ. अर्ज संबंधित विभागाकडे जमा करण्याची आवश्यकता नाही.

## परिक्षेचे वेळापत्रक

| अ.क्र. | प्रक्रीया | दिनांक |
|---|---|---|
| १ | निम्नश्रेणी लघुलेखक, लिपिक- टंकलेखक, प्रोसेस सर्व्हर, व शिपाई पदाकरीता अर्ज करावयाच्या व परिक्षा शुल्क भरण्याचा कालावधी | दिनांक ९ ऑगस्ट २०१८ पासून दिनांक २९ ऑगस्ट २०१८ पावेतो |
| २ | प्रवेशपत्र ऑनलाईन प्रींट काढावयाचा कालावधी | दिनांक १४ सप्टेंबर २०१८ पासून पुढे |
| ३ | ऑनलाईन संगणक आधारीत (Computer Based online examination) परिक्षेचा दिनांक | दिनांक २२ किंवा २३ सप्टेंबर २०१८ |
| निम्नश्रेणी लघुलेखक पदाच्या संगणक आधारीत (Computer Based online examination) परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या गुणवत्ता प्राप्त उमेदवारांची लघुलेखन, टंकलेखन वेग चाचणी परिक्षेचा दिनांक व वेळ नंतर जाहिर करणेत येईल. | | |

**दिनांक :- ७ ऑगस्ट २०१८**

**(एन.सी.पवार)**
**नोडल ऑफीसर,**
**पुणे, नाशिक, नागपूर, आमरावती व औरंगाबाद विभाग,**
**भाडे नियंत्रण कायदा न्यायालय**